# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ४८ शुक्रवार दि.२२ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# राहुल गांधींनी बिहारमध्ये यात्रा नाही तर हज यात्रा करावी ; 'या' माजी काँग्रेस नेत्याचे वादग्रस विधान

काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बिहारमध्ये मतदार हक्क यात्रा काढली होती. त्यांच्या या यात्रेवरून आता काँग्रेसचे माजी नेते आचार्य प्रमोद कृष्णम यांनी राहुल गांधींवर हल्लाबोल केला आहे. आचार्य प्रमोद यांनी,राहुल गांधींनी बिहारमध्ये यात्रा करू नये, त्यांना बिहारमध्ये प्रवास करून काही फायदा होणार नाही. आचार्य प्रमोद पुढे म्हणाले की राहुल गांधींनी हज यात्रेला जावे. असा सल्ला दिला आहे.

आचार्य प्रमोद काय म्हणाले? लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बिहारमधील मतदार हक्क यात्रेवर टीका करताना आचार्य प्रमोद कृष्णम यांनी हे विधान केले आहे. आचार्य यांनी, राहुल गांधींनी बिहारमध्ये प्रवास करू नये, त्यांना बिहारमध्ये प्रवास करून काही फायदा होणार नाही, त्यांनी हज यात्रेला जावे. जर निवडणूक आयोग चोर असेल तर राहुल गांधींनी लोकसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा. उत्तर प्रदेशातील ३०/३५ खासदार निवडणूक आयोगाचे प्रमाणपत्र घेऊन आले आहेत, त्यांनी राजीनामा द्यावा. जर निवडणूक आयोग चोर असेल तर सरकारला हिमाचल प्रदेश, तेलंगणामध्ये राहण्याचा अधिकार नाही. या निवडणूक आयोगाच्या प्रमाणपत्राने संसदेचे सर्व सदस्य जिंकले आहेत.असे म्हणत राहुल गांधींच्या आरोपांना उत्तर दिले.



राहुल गांधी एक असामान्य व्यक्ती आचार्य प्रमोद कृष्णम यांनी यांनी पुढे बोलताना, मतचोरीचे तुमचे आरोप मानसिक दिवाळखोरीचा पुरावा आहेत. ज्या व्यक्तीला आपल्या वडीलधाऱ्यांचा आदर कसा करायचा हे माहित नाही, ज्याला आपल्या संस्कृतीचा आदर कसा करायचा हे माहित नाही, ज्याला आपल्या देशाचा आदर कसा करायचा हे माहित नाही, तो कोणत्याही संस्थेचा आदर करू शकत नाही.

## जिल्ह्याच्या भूषणाचा मानाचा बीड भूमिपुत्र पुरस्कार यावर्षी डॉ. विशाल राठोड, खाजगी सचिव तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जाहीर

मुंबई/ प्रतिनिधी :- जिल्ह्याच्या भूषणाचा मानाचा *बीड भूमिपुत्र पुरस्कार यावर्षी डॉ. विशाल राठोड, खाजगी सचिव तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जाहीर झाला आहे. * लोकमत तर्फे देण्यात येणारा हा पुरस्कार आपल्या कार्यकुशलतेची, सामाजिक बांधिलकीची आणि जनतेप्रती असलेल्या निष्ठेची दखल म्हणून जाहीर करण्यात आला आहे. डॉ. विशाल राठोड यांनी आपल्या कार्यकाळात विकासात्मक योजनांची अंमलबजावणी, शासकीय कामकाजातील पारदर्शकता, तसेच सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांबाबत दाखवलेली तत्परता यामुळे प्रशासनात वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांचा आणि कार्यतत्परतेचा गौरव या पुरस्काराद्वारे करण्यात आला आहे. बीड भूमिपुत्र पुरस्कार हा बीड जिल्ह्यातील कार्यरत व्यक्तींना



मिळणारा प्रतिष्ठेचा सन्मान मानला जातो. समाजकारण, प्रशासन, कला, संस्कृती, शिक्षण आदी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या पारितोषिकाच्या घोषणेनंतर बीड जिल्ह्यातील विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातून डॉ. विशाल राठोड यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांचा हा सन्मान तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. प्रामाणिकपणा, मेहनत आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी – यामुळेच यश आणि सन्मान मिळतो, हा 'बीड भूमिपुत्र पुरस्कार' त्याचा पुरावा आहे.

## संभाजी ब्रिगेड बीड जिल्ह्याच्या वतीने विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लक्षवेधी आंदोलन

केज/प्रतिनिधी संभाजी ब्रिगेड बीड जिल्ह्याच्या वतीने विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लक्षवेधी आंदोलन घोषणाबाजी करून प्रशासनाचे लक्ष वेधून निदर्शने करण्यात आले. सरकारने तात्काळ मराठा, धनगर आरक्षणाचा तिढा सोडवावा जवळपास गेली तीस वर्षांपासून मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड च्या माध्यमातून मराठा व कुणबी एकच आहे म्हणून वेळोवेळी आंदोलने मोर्चे काढून शासन दरबारी मांडलेले आहे. शेतकरी आर्थिक दृष्टीने कमकुवत झाला असून राज्य सरकारने सरसकट कर्जमाफी करावी,दूधभेसळ रोखून दुधाला प्रतिलिटर ७० रुपये भाव देण्यात यावा, उसाला एफआरपीनुसार भाव द्यावा यासह इतर मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनात संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष शरद भाऊ चव्हाण, विभागीय कार्यकारिणी सदस्य विजय दराडे,जिल्हा अध्यक्ष



पश्चिम शशिकांत कन्हेरे, जिल्हा अध्यक्ष मध्य छत्रभुज देशमुख, पूर्व जिल्हाध्यक्ष राहुल खोडसे,गणेश मस्के संघमेश अंधळकर, योगेश्वर अंबाड, दुर्गेश जाधव, अशोक सोमवंशी, कमलाकर चव्हाण, तुकाराम नावडकर, गजानन अंबाड, भागवत खोडसे,अमोल गोरे, अमोल निकाळजे अशोक हंडीबाग तसेच शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.

## लातूर शहरात मंडप, पेंडॉल तपासणीसाठी पथके गठीत

लातूर :- मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सण, गणेश उत्सव, नवरात्र उत्सव, समारंभप्रसंगी उभारण्यात येणाऱ्या मंडप, पेंडॉलच्या तपासणीसाठी पथके गठीत करण्यात आली आहेत. ही पथके लातूर महानगरपालिका हद्दीमधील मंडप, पेंडॉल तपासणी करणार असल्याची माहिती लातूरच्या उपविभागीय दंडाधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी दिली. एमआयडीसी पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पोलीस निरीक्षक समाधान चावरे (दूरध्वनी क्र. २२०१००, भ्रमणध्वनी क्र. ९६३७१६५५२६, ई-मेल आयडी ps.midc.laturmahpolice.govi.in), लातूरचे नायब तहसीलदार सतिष कांबळे (दूरध्वनी क्र. २४२९६२, भ्रमणध्वनी क्र. ९५४५२९२९०१, ई-मेल आयडी- laturtahsildargmail.com), लातूर महानगरपालिका ए झोनचे सहायक आयुक्त बंडू किसवे (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ९०११०३२३०२, ई-मेल आयडी mclaturgmail.com) यांचा समावेश असणार आहे. शिवाजी नगर पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पोलीस निरीक्षक दिलीप सागर (दूरध्वनी क्र. २४३१००, भ्रमणध्वनी क्र. ९५५२६६४३००, ई-मेल आयडी- psshivajinagargamil.com), नायब तहसीलदार गणेश सरोदे (दूरध्वनी क्र. २४२९६२, भ्रमणध्वनी क्र. ७५८८५३३१८४, ई-मेल आयडी- laturtahsildargmail.com), लातूर महानगरपालिकेचे बी झोन अधिकारी संतोष लाडलापुरे (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ९४२३७१९००१, ई-मेल आयडी- mclaturgmail.com) यांचा समावेश आहे. विवेकानंद चौक पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पोलीस निरीक्षक संतोष पाटील (दूरध्वनी क्र. २५८१००, भ्रमणध्वनी क्र. ९९२३८७१९९९, ई-मेल आयडी- psvivekanandchowk405gamil.com), नायब तहसीलदार परमेश्वर कांबळे (दूरध्वनी क्र. २४२९६२, भ्रमणध्वनी क्र. ९४२१४००२५१, ई-मेल-आयडी- laturtahsildargmail.com), लातूर महानगरपालिका सी झोन अधिकारी समाधान सूर्यवंशी (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ९४०४२२५३७९, ई-मेल- mclaturgmail.com) यांचा समावेश राहील. गांधी चौक पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड (दूरध्वनी क्र. २४२१००, भ्रमणध्वनी क्र. ८७६७६१७८८४, ई-मेल आयडी- psgandhichauk405gamil.com), नायब तहसीलदार गणेश अंबर (दूरध्वनी क्र. २४३४६२, भ्रमणध्वनी क्र. ७५८८६९२४६१, ई-मेल आयडी- laturtahsildargmail.com), महानगरपालिका डी झोन सहाय्यक आयुक्त विजय राजुरे (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ८८०६८२२४६२, ई-मेल आयडी- mclaturgmail.com यांचा समावेश आहे.

## आज तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये व्याख्यानाचे आयोजन.

बीड:-भारतीयधम्ममहासंघच्यावतीनेडॉक्टरबाबासाहेबआंबेडकरांची पालि भाषा पुनर्जीवनाची चळवळ गतिमान करण्यासाठी तुलसी इंग्लिश स्कूल शासकीय आयटीआय कॉलेजच्या मागे नगर रोड, बीड. येथे दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. प्राचीन भारताची म्हणजे जंबुद्विपाची भाषा म्हणजे पालि भाषा होय. पालि भाषा ही सर्व भाषेची जननी आहे परंतु आपणास चुकीचं शिकवण्यात आल आहे. या भाषेचे व्यवहारात पुनर्जीवन व संवर्धन या विषयावर प्रा. डॉ. सुरेश सोनोने संचालक प्रज्ञा पालि भाषा प्रशिक्षण केंद्र, लातूर. यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्व पालि भाषा प्रेमी बौध्द उपासक व उपासिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहवे असे आवाहन भारतीय धम्म महासंघाचे बीड जिल्हा युनिट- एस एम जोगदंड, रवीं चंदवधन जाधव, धर्मराज मुजमुले, भिवाजी जोगदंड, सुरेश साबळे, राहुल कांबळे, सतीश कापसे ९८५००२९४४९, ८९९९४२३३२३ यांनी केले आहे.

## जगाला संताचे विचारच वाचवू शकतात - ह.भ.प. महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री

### शिवरत्न पुरस्कार वितरण व गुणगौरव सोहळा एक अविस्मरणीय समारंभ संपन्न

लातूर - जगद्गुरू तुकोबाराय त्या काळातील खरे पत्रकार होते. तुकोबारायांनी ज्या विषयाला स्पर्श केला त्या विषयाचा अभ्यास आज सर्व धर्मातील तत्त्ववेता आजपण करत आहेत. त्यांनी सर्व समाजाला एकत्र करण्यासाठी प्रयत्न केले त्यांच्या लिखाणातून क्रांती घडली असे प्रतिपादन शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी अध्यक्षीय भाषणात ह.भ.प. महंब महादेव महाराज बोराडे शास्त्री म्हणाले. यावेळी उद्घाटक माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, कळंब धाराशिवचे आ. कैलास घाडगे पाटील, माजी महापौर दिपक सुळ, छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना देशमुख, जेष्ठ पत्रकार रघुनाथ बनसोडे, संपादक भारत जाधव विचार मंचावर उपस्थित होते.







पुढे बोलतांना महाराज म्हणाले की, लिखान करणार्याचे काम खुप मोलाचे असते म्हणूनच ज्या वेळी संताच्या विचाराने तरुण कर्म करू लागतील त्यावेळी ते विचार जगापुढे आदर्श ठरू लागतात. असे कर्म छत्रपती शिवाजी महाराजांनी करून दाखवले आहेत म्हणूनच जगाला संताचे विचारच वाचवु शकतात असे प्रतिपादन ह.भ.प. महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांनी आपल्या भाषणात केले. यावेळी विनायराव पाटील म्हणाले की, या देशात लोकशाही आहे का असा प्रश्न पडत आहे सध्या न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकारांनी प्रयत्न केला तरच लोकशाही वाचू शकणार आहोत या लोकशाहीत लोकांनी विचार करणे गरजेचे आहे असे म्हणाले. आ कैलास घाडगे पाटील म्हणाले की, धाराशिव जिल्ह्यातून लातूरची निर्मिती झाली एका तालुक्याचा जिल्हा होतो आणि विकासात सर्वात पुढे जातो. विलासराव साहेबांचे नेतृत्व तुम्हाला लाभले, त्यामुळेच मोठा भाऊ मागे राहिला अन् लहान भाऊ पुढे गेला असे ते यावेळी म्हणाले. दिपक सुळ म्हणाले की, बारा वर्षे पत्रकारिता क्षेत्रात टिकून राहणे सोपे नाही, पत्रकारितेच्या लेखणीची ताकद खूप मोठी आहे. आ. कैलास घाडगे पाटील जसे निष्ठावंत कार्यकर्ता होऊ शकतात तसाच मी पण अमितभैय्याचा निष्ठावंत कार्यकर्ता आहे असे आपल्या अभ्यासु भाषणात म्हणाले. राज्यात सत्ताधार्यांनी विरोधी पक्ष शिल्लक ठेवला नाही ती भूमिका छावा संघटनेला बाहेरून पार पाडावी लागते व माझ्यावर हल्ला झाला लातूरसह राज्यात तीव्र निषेध नोंदवला परंतु लोकशाही मानणारे आम्ही अण्णासाहेबांचे छावे आहोत असे परखड मत छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी यावेळी मांडले. प्रत्येक प्रश्नाला वाचा फोडून न्याय देण्याची भूमिका या वृत्तपत्राने पार पाडली आहे यापुढेही रोखठोक भूमिका घेऊन आपण वाटचाल करावी अशी अपेक्षा करतो असे जेष्ठ पत्रकार रघुनाथ बनसोडे म्हणाले. पुरस्कारर्थीकडून सुधाकर तेलंग अध्यक्ष लातूर विभागीय शिक्षण मंडळ यांनी आपले विचार मांडले. या शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळ्यास गर्जा महाराष्ट्र माझा या गीताने व दिपप्रज्वलन करून सुरूवात झाली. तसेच जनतेच्या हक्काचं लातूर मिशन या गिताचा अनावरण सोहळा मान्यवराच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सौ. रेशमा गंभीरे सरपंच सिकंदरपूर, सुधाकर तेलंग अध्यक्ष लातूर विभागीय शिक्षण मंडळ, इसरार सगरे चेअरमन लातूर मल्टीस्टेट को. सोसायटी, डॉ. प्रो. आनंद पवार अधिष्ठाता कै. बी.व्ह. काळे आयुर्वेद महाविद्यालय, समाधान सुर्यवंशी क्षेत्रीय अधिकारी मनपा लातूर, सुनिल लाडके मंडळ अधिकारी बाभळगाव, ओमप्रकाश पवार उद्योजक मुरूड, दत्तात्रय परळकर संपादक समृद्ध व्यापार, सामना ढोल ताशा पथक लातूर यांना या वर्षीचा शिवरत्न पुरस्कार देवून गौरविण्यात आले. तसेच विशेष सत्कार सुरेश काचबावार, डॉ. बालाजी वाघमारे, प्रा. तानाजी घुटे, कुमार भालेराव, गीतकार राजन सरवदे यांचा करण्यात आला. यावेळी अनाथ व गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला महिला वर्गासह प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्यक्रमाचे प्रास्ताविक संपादक भारत जाधन यांनी केले तर सुत्रसंचलक बालाजी कांबळे यांनी केले शेवटी आभार दिपक बोराडे पाटील यांनी मानले. यावेळी माधव गंभीरे, संतोष दगडे, दिपक नरवडे उपसंपादक परमेश्वर घुटे, जिल्हा प्रतिनिधी गणेश स्वामी, सल्लागार - गणेश होळे, सादिक शेख, कैलास साळुंके, श्रीराम गायकवाड, दयानंद माने, ईश्वर बद्दर, शंकर जाधव, अमित तिकटे, कैलास ढोले, गोविंद जगताप, मनोज चव्हाण, विष्णु शिंदे, महेश राठोड, उमेश भिसे, ज्ञानेश्वर सुर्यवंशी, तुकाराम जोगदंड, अनिल शेळके, केदार वांगसकर, संतोष मगर, लखन सावंत, अजित माने, आदित्य जाधव, यश दुटाळ, महालिंग तटाळे, दयानंद स्वामी ढवळे यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## आव्हानांचा थेट मुकाबला करण्याची गरज

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शुल्क धोरणामुळे जगातील अर्थव्यवस्था धोक्यात आली आहे. 'अमेरिका फर्स्ट' या नावाखाली ट्रम्प यांनी चालविलेली कुर्हाड अनेक देशांना घायाळ करत आहे, तर काही देश चोखपणे उत्तर देण्यासाठीही सक्षम होत आहेत; परंतु अशा प्रकारचे धोरण राबविणारे ट्रम्प हे पहिलेच अध्यक्ष आहेत का? १९७०, ८० आणि ९० च्या दशकांतही अध्यक्षांनी बचावात्मक धोरणापोटी काही देशांना वेठीस धरण्याचा प्रयत्न केला होता.

जशास तसे शुल्क धोरणाला शस्त्र म्हणून समोर आणत, अमेरिकेच्या बचावात्मक व्यापार व्यवस्थेने आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेला सर्वात कठीण आणि अनिश्चित काळात नेऊन ठेवले आहे. ट्रम्प यांनी अध्यक्षपद सांभाळल्यापासून जशास तसे शुल्क धोरणांच्या माध्यमातून देशाचे हित साधण्यासाठी अशा प्रकारचे करार लादणे सामान्य बाब झाली आहे. एखाद्या विशिष्ट देशासमवेतचा व्यापार नियंत्रित करण्यासाठी शुल्क धोरणाचा मनमानीप्रमाणे वापर करण्याचा मुद्दा केवळ बचावापुरता मर्यादित नाही तर त्याला बरेच कंगोरे आहेत. अनेक समीक्षकांच्या मते, या धोरणांमागे केवळ अमेरिकी अर्थव्यवस्थेला अन्य देशांच्या स्वस्तातल्या निर्यातीपासून वाचवणे किंवा देशात उत्पादन क्षेत्राला चालना देणे, हेच कारण नसून, त्याहीपेक्षा अधिक राजकीय शक्ती दाखविणे आणि वर्चस्व गाजविणे होय. या धोरणामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक प्रकारच्या तीव्र प्रतिक्रिया पहावयास मिळत आहेत. एकीकडे चीनने या धोरणाला तीव्र विरोध केला, तर युरोपीय संघ कराराच्या दबावाखाली झुकला आहे. जपानचा व्यापारी करार अमेरिकेलाच लाभदायी ठरणारा आहे. भारताकडून त्यास विरोध केला जात आहे. संभाव्य करारातून सकारात्मक निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी दोन्ही देशांत सुरू असलेल्या चर्चेचे भवितव्य पाहिले, तर एकप्रकारे संकटाचीच स्थिती दिसत आहे.

अमेरिकेने भारतावर ५० टक्के शुल्क आकारणी केली आहे. त्यात रशियाकडून तेल खरेदी केल्याप्रकरणी दंड म्हणून २५ टक्के शुल्काचा समावेश आहे. या लेखाचा उद्देश जशास तसे शुल्क आणि व्यापार करारामुळे जगभरात पडलेली फूट पाहता भारताच्या त्याच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष तसेच दोन्ही पातळीवर पडणार्या व्यापक परिणामाचे विश्लेषणांचा आहे. सर्वात पहिले म्हणजे अप्रत्यक्ष परिणाम पाहू. हे परिणाम स्वाभाविकपणे गुंतागुंतीचे आहेत. अध्यक्ष ट्रम्प यांनी निर्माण केलेल्या व्यापारी अनिश्चिततेमागे अनेक अर्थ दडलेले आहेत. जागतिक बँकेचे नवीन आकडे पाहिले तर चालू आर्थिक वर्षात जागतिक आर्थिक विकासाचा दर मंदावण्याची शक्यता आहे. अशावेळी भारताच्या विकासकार्यावर परिणाम होऊ शकतो. विविध अंदाज पाहिले, तर जशास तसे शुल्कामुळे भारताच्या विकासात ५० ते शंभर बेसीस पॉईंटमध्ये घसरण येऊ शकते. दुसरे म्हणजे रशिया हा कच्च्या तेलाचा प्रमुख पुरवठादार देश आहे आणि तो जगाच्या एकूण उत्पादनाचा बारा टक्के वाटा उचलतो. तेल उत्पादनात तिसर्या क्रमाकांचा आहे.अशावेळी रशियाकडून तेलखरेदीवर बंदी घालणे किंवा रशियावर व्यापक निर्बंध लादण्याचे प्रयत्न कितीकाळ राहतील, त्याबाबत साशंकता आहे. मात्र, या निर्णयामुळे कमी काळासाठी का होईना तेल पुरवठ्यात अडथळा येऊ शकतो आणि वीज निर्मितीत घट होईल. परिणामी, व्यापकप्रमाणात चलनवाढीची समस्या राहू शकते. भारतालादेखील या आव्हानाकडे लक्ष द्यावे लागेल. तिसरे म्हणजे आर्थिक शक्तीच्या पुनर्बांधणीचा विचार होत असताना त्यातही आव्हाने निर्माण होऊ शकतात. कारण, ट्रम्प हे अमेरिकेचे आर्थिक हित जोपासण्याच्या नावावर अनेक देशांना धमक्या देत राहतील.

प्रत्यक्ष प्रभावाचे आकलन सहजपणे करता येईल. अमेरिकेचे शुल्क धोरण हे भारताच्या निर्यातीच्या क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम करणारे आहे. यात प्रामुख्याने कामगारबहुल उद्योगातून निर्माण होणार्या वस्तूंचा समावेश आहे. यात कपडे, रत्न, दागिने, झिंगा, चर्मोद्योग, रासायनिक पदार्थ, वाहनांचे सुटे भाग आदींचा समावेश करता येईल. या क्षेत्रावर नकारात्मक परिणाम हा थेटपणे भारताच्या रोजगार स्थितीवर पडेल. अगोदरच भारत बेरोजगारीच्या उच्च दराचा सामना करत आहे. अशावेळी ट्रम्प शुल्कामुळे रोजगारावर होणार्या नकारात्मक परिणामावर सखोल विश्लेषण करणे गरजेचे आहे. यानुसार देशाला धोरणात्मक कारवाई करता येईल आणि या धोरणात शुल्कामुळे नोकरी गमावणार्या लोकांसाठी सामाजिक सुरक्षा, उत्पन्न स्थानांतराचे मुद्दे असायला हवेत. गेल्या काही महिन्यांत जागतिक बाजार आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याची दिशा ही देवाण-घेवाण केंद्रित राहताना दिसत आहे. अर्थात, हे चित्र ट्रम्प यांची व्यक्तिगत भूमिका अणि त्यांनी मांडलेल्या धोरणाचाच परिपाक आहे. अशा प्रकारचे व्यापारधोरण दीर्घकाळासाठी अमेरिकी अर्थव्यवस्थेला हानिकारक ठरू शकते. पण, बचावात्मक धोरण ही केवळ ट्रम्प यांचीच देणगी आहे का? असे नाही.

२०१९ मध्ये जर्नल ऑफ इकोनॉमिक पर्सपेक्टिव्हमध्ये मेरी अमिटी, स्टिफ जे. रेडिंग आणि डेव्हिड ई. विस्टोन यांच्या प्रकाशित एका अभ्यास अहवालात या विषयावर सखोल विश्लेषण केले आहे. त्यात म्हटल्यानुसार, १९७१ मध्ये रिचर्ड निक्सन यांनी शुल्कपात्र आयातीवर १० टक्क्यांचा अधिभार शुल्क लावला होता. १९७७ मध्ये जिमी कार्टर यांनी चपलेच्या आयातीचा कोटा निश्चित केला होता. १९८१ मध्ये रोनाल्ड रेगन यांनी जपान सरकारवर दबाव आणत अमेरिकेत जपानी ऑटोमोबाईलची निर्यात मर्यादित करण्यासाठी ऐच्छिक निर्यात करार लागू केला. या क्रमानुसार २००२ मध्ये जॉर्ज डब्ल्यू बुश यांनी पुढचे पाऊल टाकत पोलादावर शुल्क लागू केले. २००९ मध्ये बराक ओबामा यांनी चीनच्या टायरवर ३५ टक्के शुल्क लादले होते. केवळ जॉर्ज एच. बुश आणि बिल क्लिंटन यांनीच या परंपरेला विरोध केला होता. क्लिंटन यांनी तर कारकिर्दीच्या पहिल्याच वर्षी १९९३ मध्ये उत्तर अमेरिकी व्यापार करारावर स्वाक्षर्या करत व्यापाराला अधिक उदारमतवादी केले होते. भूतकाळातील अमेरिकेच्या शुल्क आकारणी धोरणाचे उदाहरण पाहिले तर बहुतांशवेळा त्यांच्या सहकारी देशांनीच जागतिक व्यापार संघटनेकडे तक्रारही केली. अशा वेळी आपण ट्रम्प यांच्या दिखावू निर्णयावर गरजेपेक्षा अधिक महत्त्व देत आहोत का? हे नाटक लवकर संपेल की, यात जागतिक व्यापार व्यवस्थेला मुळापासून बदलण्याची शक्ती आहे? काहीही असेल तरी सध्याचे परिणाम धोकादायक असू शकतात. अमेरिकी शुल्क धोरणांमुळे निर्माण होणारी व्यापार अनिश्चितता ही दीर्घकाळ राहत असेल, तर जागतिक अर्थव्यवस्थेत अस्थिरता आणखी मुरेल. अशावेळी भारताला या आव्हानात्मक काळाचा सामना करण्यासाठी थेट मुकाबला करावा लागेल.

# लोकांचे जीव घेणारा डीजे बंदच करा

आपल्या समाजात प्रत्येक शुभ कार्यक्रमात म्हणजेच विवाह, लग्नाची वरात , जयंती उत्सव, वाढदिवस, निवडणुकीत विजयी उमेदवाराची मिरवणूक, दसरा , दिवाळी, गणेशोत्सव, दहीहंडी, अशा एक ना अनेक कार्यक्रमात डीजेचा सर्वत्र वापर सुरू झालेला आहे. पण त्या डीजेच्या आवाजाचे दुष्परिणाम मानवाच्या आरोग्यावर होऊ लागलेले आहेत. त्याचं कोणीच विचार करत नाही. काहींचे प्राण गेलेले आहेत. काहींना कायमची बहिरेपण आलेले आहे. काहींना हृदय विकाराचा झटका येऊन त्याचे प्राण गेलेले आहेत.

सर्वत्र शांतता भंग होत असतो.असा अघोरी आनंदापेक्षा दुःखच देणाऱ्या डीजे कायमची सरकारने बंदीच घातली पाहिजे. समस्या निर्माण झालेल्या आहेत. या संबंधी डॉक्टर संतोष माने कान नाक घसा यांचा माहिती पूर्णलेख दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी वाचनात आला आहे. ती तुम्ही सुधा वाचला असेल तो असा की, सणासुदीच्या काळात कानांची घ्या विशेष काळजी .डीजे, फटाके , लाऊडस्पीकरचा अतिरेक टाळा, मोठ्या आवाजामुळे अचानक बहिरेपणा धोका गणेशोत्सव ,नवरात्र , दिवाळी असे सीीीीण येतात. तेव्हा शहरात उत्साहाचे वातावरण असतं. मिरवणुका , ढोल ताशा पथक, डीजे ,फटाके या सगळ्यामुळे वातावरणात ऊर्जा निर्माण होते.

पण याच कर्णकर्कश आवाजामुळे कानाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. एवढेच काय तर बहिरेपणाचा धोका संभवतो. त्याकडे दुर्लक्ष नको.काळजी घ्या.- डॉक्टर संतोष माने कान ,नाक,घसा तज्ञ. साधारण वर्षभरापूर्वी दिनेश (काल्पनिक नाव) नावाचा तरुण क्लिनिकमध्ये आला. सोबत भाऊ आणि वडील होते. वडिलांनी सांगितले त्याला तीन दिवसापासून काही ऐकू येत नाही प्रथम वाटते की त्याच्या कानात मळ साचला असेल व पाणी गेले असेल मात्र तपासणीत कानाचे पडदे पूर्णपणे व्यवस्थित होते .पण मी त्यांना विचारले कानात काही मोठा आवाज झाला होता का ?

मी जास्त खोदून विचारल्यावर समजले की तीन दिवसा पूर्वी गणपती मिरवणुकीत डीजेच्या अगदी समोर नाचत होता असे उत्तर ऐकताच डीजेचा दणदणाट व मित्र सोबत नाचण्याच्या उत्साहात बेभान झालेल्या तरुणाईला रोखणार कोण ? असा हतबल करणारा सवाल क्षणात माझ्या मनात येऊन गेला. मात्र याच डीजेच्या प्रचंड ध्वनिलहरीचा परिणाम होऊन त्याच्या कानातील संवेदन पेशींना मोठी हानी झाली होती. मला कळून चुकले की मोठ्या कर्ण कर्कश आवाजामुळे त्याला बहिरीपणा आला आहे प्रत्येक मनुष्य १० ते ८० डीसीमल पर्यंत आवाज ऐकू शकतो.

मात्र त्यापेक्षा जास्त मोठा आवाज हा कानासाठी धोकादायक मानला जातो गेल्या काही वर्षात ध्वनी प्रदूषणात खूप वाढ झाली आहे. त्यामुळे आमच्याकडे आता अशा अचानक बहिरीपणा आलेल्या रुग्णांचे प्रमाण वाढले आहे .मोठ्या आवाजामुळे नुकसान झाल्यास तात्पुरता किंवा कायमस्वरूपी बहिरीपणा येऊ शकतो. एकदा का पेशीची नुकसान झाले की त्या पुन्हा निर्माण होत नाहीत. डीजेचा १०० डिसीमल पेक्षा जास्त आवाज केवळ काही मिनिटातच कानातील हेअर सेल्स नष्ट करू शकतो. त्यामुळे सणाचा आनंद घेताना कानाच्या आरोग्याचे भान ठेवणे अत्यावश्यक आहे. श्रवण क्रिया कशी घडते.

मानवाच्या कानाचे तीन भाग असतात. एक बाह्यकान बाहेरील ध्वनी तरंग पकडतो ,दोन मध्यकान आवाजाचे कंपन अंत कानावर पर्यंत पोहोचवतो. अंतिम अंतर्गत कोणतीच्या अवयवातील ध्वनी तरंगाला विद्युत सिग्नल्स मध्ये रूपांतरित करतात आणि ऑडिटरी नर्व्हज मार्फत ते मेंदूपर्यंत पोहोचवतात. ✻ गंभीर परिणाम... डीजेच्या आवाजाने पार्टी कार्यक्रम आणि सामाजिक सोहळ्याला एक वेगळा रंग दिला आहे .मात्र ,या प्रचंड आवाजाने लहान मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. कान हे आपल्या शरीराची संवेदनशील अंग आहे आणि त्याची काळजी घेणं अत्यंत आवश्यक आहे.

डीजेच्या मोठ्या आवाजामुळे कानातील कॉकलिया (कानातील लहानसे स्पॉयरल आकाराचे अवयव जे आवाजाचे सवेदी तंतू असतात या सरचनेला गंभीर नुकसान होऊ शकते सतत आणि जास्त आवाजामुळे या तंतूवर ताण येतो आणि तो नष्ट होण्याची शक्यता वाढते. ✻ लहान मुलांसाठी आवाजाचा धोका....(१) लहान मुलांच्या कानाची सरचना मोठ्यांच्या तुलनेत जास्त नाजूक असते. त्यामुळे कानावर त्वरित वाईट परिणाम होतो प्रचंड आवाजाने मुलांच्या कानातील संवेदनशील अवयव वेगाने प्रभावित होतात. सतत उच्च आवाज ऐकून त्रास सतत मोठ्या आवाजाला सामोरे गेल्यास हळूहळू कानाला हानी होते आणि नंतर आवाज कमी ऐकणे किंवा काही वेळाने पूर्णपणे ऐकू न येणे देखील होऊ शकते.

(२) मानसिक ताण आणि अस्वस्थता जोरदार आवाजामुळे मुलांना घाबरटपणा, चिडचिड झोपेची समस्या यासारखे मानसिक त्रास ही होऊ शकतात, विजेचा प्रचंड आवाज लहान मुलांच्या कानासाठी गंभीर धोका ठरू शकतो, त्यांचे कान आजारी होणे किंवा आवाज कमी ऐकू येणे या समस्या पुढे मोठ्या प्रमाणावर वाढू शकतात आणि त्यामुळे पालकांनी शिक्षकांनी कार्यक्रम आयोजकांनी आणि समाजाने यासाठी योग्य खबरदारी घेणे अत्यंत गरजेचे आहे. मुलांच्या आरोग्यासाठी आणि त्यांच्या भविष्याचा विचार करायला हवा

✻ ध्वनी प्रदूषण नियमन व नियंत्रण नियम २००० नुसार ध्वनी मर्यादा करण्यात आल्या आहेत (डीसीमध्ये)

| प्रकार | दिवसामर्यादा | रात्रीमर्यादा |
|---|---|---|
| (१) औद्योगिक. | ७५. | ७० |
| (२) व्यवसायिक. | ६५. | ५५ |
| (३) रहिवाशी | ५५. | ४५ |
| (४) शांतता क्षेत्र. | ५०. | ४० |

विशेषता रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत लाऊड स्पीकर ,डीजे ,फटाके यांचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे.✻ ध्वनी पातळी किती धोकादायक ? मनुष्य १० ते ८० डेसिबल पर्यंत आवाज सुरक्षितपणे ऐकू शकतो. त्या पेक्षाजास्त आवाज धोकादायक ठरतो. डीजे, स्फोटक फटाके, ढोल ,ताशा पथकांचा आवाज १०० ळ डिसिबल पर्यंत जाऊ शकतो. जो फक्त काही मिनिटातच नुकसान करू शकतो.

✻ काळजी घेण्यासाठी उपाय....

तीव्र आवाज असलेल्या ठिकाणापासून शक्यतो दूर राहा.मिरवणुका ,सण ,फटाके , सायरन यावेळी शक्य असल्यास एअर क्लब किंवा एअरमपसचा वापर करावा. कारखाने, विमानतळ ,खाणकाम ,बांधकाम यासारखे ठिकाणी काम करताना श्रवण संवर्धन साधने वापरणे आवश्यक आहे .शक्य असल्यास आवाज कमी करणाऱ्या हेडफोन्सचा वापर करावा .ऐकण्यात थोडाही त्रास जाणवला तर त्वरित ईएनटी तज्ञांचा सल्ला घ्या. - डॉ. संतोष माने काना घसा तज्ञ. वरील महत्वपूर्ण माहिती वाचल्यानंतर डिजे किती मानवाच्या आरोग्याला हानी कारक आहे. त्यासाठी लोकांचे जीव घेणारा डीजे बंदव करा

✻✻✻✻✻✻✻

लेखक
जी.एस.कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न. ७५८८५६०७६१

# बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा 'बैलपोळा'

बैलपोळ्याचा दिवस हा शेतकऱ्यांची बैलांविषयी असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस होय आणि ही कृतज्ञता या 'पोळा' सणाच्या निमित्ताने आम्ही भारतीय सातत्याने जोपासत आलेलो आहोत. भारतीय संस्कृती मनुष्या सोबतच निसर्ग आणि प्राणीमात्रांची देखील पूजा करायला शिकवते. अलीकडे खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या आडून पशुपालकांसह शेती करणारा शेतकरीवर्ग हा देशोधडीला लागलेला आहे, याची जाण शासनानी ठेवली पाहिजे. त्यातूनच त्याची दिवसेंदिवस होत असलेली कुचंबना व आत्महत्या ही योग्य नाही. जर जगवणाराच जर जगला नाही, तर एक दिवस स्वदेशीचा ठेंभा मिरवणाऱ्या भारतीयांना विदेशी अन्नाशिवाय जगणे कठिण होऊन बसेल हे विसरता येणार नाही.

'पोळा' हा सण श्रावण महिन्यात पिठोरी अमावस्याच्या दिवशी येतो या महिन्याची सुरुवात होताच अनेक सण उत्सवांची रेलचेल सुरू होते. पावसाचे दिवस असल्याने सृष्टीचे सौदर्यही खुलून दिसते. अशा या श्रावणात नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी या सणांनंतर सरत्या श्रावणात येतो बैल पोळ्याचा सण. संपूर्ण महाराष्ट्रात आजही मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो असा सर्जा-राजाचा सण म्हणजे 'पोळा.' शेतकरी बांधवांसाठी पोळा या सणाचे महत्व खूप आहे. शेतीतील बैलांच्या महत्त्वाची आठवण करून देणारा हा सण दोन शतकांहून अधिक काळापासून चालत आलेली परंपरा आहे. या दिवशी वर्षभर शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या बैलाची पूजा केली जाते. या सणाची शहरापासून तर गावापर्यंत धूम असते. परंतु या सणाचे विशेष आकर्षण गावांमध्येच पहावयास मिळते. वर्षभर शेतात कष्ट करून राबणाऱ्या आणि शेतकऱ्याचा खांद्याला खांदा लावून शेतीत मदत करणाऱ्या बैलाला या दिवशी पुजले जाते. त्याचे आपल्यावर अनंत उपकार आहेत.

ज्यांच्या घरात बैलजोडी नसते ते लोक माती व लाकडाचे बैल देखील पूजतात. बैलपोळ्याचा सण हा शेतीवर आधारित आहे व हा सण आपल्या बैलांचे व शेती तसेच शेतकऱ्यांच्या कामी येणाऱ्या प्राण्यांचे महत्त्व सांगतो. निसर्ग, मनुष्य आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये देव आहे व यांची पूजा हीच देवाची पूजा होय, याची जाणीव हा सण आपणांस करवून देतो. पोळ्याच्या काळात शेतकरी शेतात बैल पाळत नाहीत आणि त्या दिवशी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शाळांना सुट्टी असते. फार प्राचीन परंपरेतील विशेषतः पशुपालक शेतकरी वर्गाने हजारो वर्षापासून जोपासलेला पोळा हा सण. पशुपालन अवस्थे नंतर कृषक अवस्थेत आलेल्या प्राचीन मानव समूदायाचा हा सण. भूमी आणि भाकरीसाठी राबराब राबणाऱ्या श्रमसंस्कृतीचे ते प्रतीक आहे. शेतकरी व शेतमजूराचा सच्चा साथीदार म्हणजे बैल. हे तिन्ही घटकांची परस्पर पुरकता ही अन्नासह अर्थार्जन निर्मितीसाठी देशाचा मूख्य आधारस्तंभ ठरते.

आपला बैल उठून दिसावा यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचा साजशृंगार खरेदी करतात. बैल सजवितात व पोळ्याच्या मिरवणुकीत भाग घेतात. गावाच्या सीमेजवळच्या शेतावर आंब्याच्या पानाचे एक मोठे तोरण करून बांधतात. या सणाच्या दिवशी महाराष्ट्रातल्या खेड्यांमधल्या प्रत्येक घराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते व त्या जवळ गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनई, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात. या वेळेस 'झडत्या' म्हणायची पद्धत आहे, त्यानंतर 'मानवाईक' ज्याला गावात मान आहे ती व्यक्ति, गावचा पाटील किंवा श्रीमंत जमीनदार तोरण तोडतो व पोळा 'फुटतो' नंतर बैल मारुतीच्या देवळात नेतात व नंतर घरी नेऊन त्यांना ओवाळतात. बैल नेणाऱ्यास 'बोजारा' देण्यात येतो, शेतकरी वर्गात हा सण महत्त्वाचा मानला गेल्याने या सणासाठी शेतकऱ्यांमध्ये विशेष उत्साह व आनंदाचे वातावरण असते.

भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रात व त्यातल्या त्यात विदर्भात, पोळा हा एक शेतकऱ्यांचा मोठा सण आहे. त्या दिवशी बैलांना कामकाजापासून सुट्टी असते. त्या दिवशी बैलांना न्हाऊ-माखू घालतात. त्यांना गोड पुरणपोळीचे जेवण घालतात, त्यांना सजवतात व मिरवतात. त्या दिवशी त्यांची घरोघरी पूजा होते. गावातील शेतकरी सकाळपासूनच बैलपोळ्याच्या तयारीला सुरुवात करून देतो. या दिवशी सर्वात आधी शेतकरी भल्या पहाटे उठून बैलांच्या गळा आणि नाकातील दोर काढतात. या दिवशी शेतकरी आणि त्यांचे कुटुंब बैलांना धुणे, शिंगे रंगवणे, जुने दोर बदलून नवीन बांधणे, नवीन घंटा बांधणे आणि त्याचा साजशृंगार करतात. यानंतर त्यांना सजवून त्यांची पूजा केली जाते. या दिवशी बैलाच्या खांद्याला हळद व तुपाने किंवा तेलाने शेकतात. याला 'खांद शेकणे' अथवा 'खांड शेकणे' म्हणतात. बैलाच्या पाठीवर नक्षीकाम केलेली पाठीवर घालायची झुल, सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा पायात चांदीचे व करदोड्याचे तोडे घालुन त्याला खायला सुग्रास अन्नाचा नैवेद्य देतात. काही ठिकाणी बाजरी ची खिचडी सुद्धा बैलांना खाऊ घातली जाते. सायंकाळच्या वेळी गावातील सर्व लोक आपापल्या बैलांना घेऊन गावाच्या मोकळ्या चौकात जमतात. बैलपोळ्याच्या दिवस शेतकरी आणि शेतात काम करणारे बैल व इतर सर्व प्राण्यांच्या विश्रांतीचा दिवस असतो, म्हणून या दिवशी कोणतेही काम केले जात नाही.

यानंतर संध्याकाळच्या वेळी घरातील महिला आपापल्या बैलाची आरती ओवाळून पूजा करतात. ढोल ताशांच्या गजरात त्यांची मिरवणूक काढली जाते. घरातील स्त्रिया स्वादिष्ट व्यंजन, पुरणपोळी व शिरा बनवतात व बैलांना पुरणपोळीचे जेवण दिले जाते. बैलाची निगा राखणाऱ्या 'बैलकरी' घरगड्यास नवीन कपडे देण्यात येतात.

जेव्हा कोणताच धर्म अस्तित्वात आलेला नव्हता तेव्हा पासूनच प्राचीन भारतीय मानव समुदायाने बैलपूजनाची परंपरा जोपासलेली होती हे सिंधू संस्कृतीतील उत्खननातून सिद्ध झालेले आहे. बैल हे श्रमाचे प्रतीक, त्याच्याकडून वर्षभर काम करून घेत असतांना त्याच्या या ऋणाईतून उत्तराई होण्याचा हा दिवस म्हणून 'पोळा' हा सण साजरा करण्याची ही प्रथा ग्रामीण जीवनात कायम आहे. अलीकडे जरी ट्रॅक्टरद्वारे शेतीची कामे केली जात असली तरी बैलाचे महत्त्व जनमानसात आजही कमी झालेले नाही. वर्षभर शेतकऱ्यांचा सखा बणून राहणाऱ्या या बैलांच्या अपार श्रमातून देशातील तमाम मानवास रोजगार, अन्नधान्य व भोजन मिळते. परंतु या सणानिमित्त पळस या झाडांच्या फांद्या दारासमोर, गोठ्यात, शेतात ठेवण्याचीही परंपरा असल्यामुळे लाखो झाडांची तोड या दिवसावर होते. अवकाळी पाऊस, दुष्काळ या निसर्गाच्या लहरीपणातून शेतकरी व पशुपालकांचा जीव आधीच मेटाकुटीला आलेला असतांना त्यात अशा सणोत्सवाच्या निमित्ताने होणारी वृक्ष तोड योग्य नाही, पर्यावरणाचा ऱ्हास करणारी ही पळस तोड थांबायला हवी.

रक्ताचे पाणी करणारा शेतकरी आत्महत्या करतो, उपाशी झोपतो तर या मंदीरात देव-धर्माचे अवडंबर माजवणारा पुजारी, पुरोहित, पंडीत चैनीने तुपाशी खातो हे वास्तव म्हणजे या देशाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. या देशात गाय ही गोमाता ठरवली जाते, परंतू बैल पिता ठरत नाही. मदिरात मात्र दान-दक्षिणा ऐटण्यासाठी गोमाता नव्हे तर नंदी बैलाचीच प्रतीकृती हवी असते ही विसंगती जोपासणारेच जर संस्कृती व धर्मरक्षक बणून मानवाच्याच जीवावर उठत असेल तर आमच्या धडावर आमचेच डोके व आमचाच मेंदू असल्याशिवाय खरी संस्कृती व खरा धर्म याची सत्यता कळणार नाही. कष्टाशिवाय व्यक्तीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही, सर्वांना बैल पोळ्याच्या अनेक शुभेच्छा !

✻✻✻✻✻✻✻✻✻

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# 'डिजिटल ब्लॅकमेलिंग'चे आव्हान

रोज हजारो लोक सायबर गुन्हेगारांचे सहज बळी ठरत असतील तर लोकांचे रक्षण करण्यासाठी कुठलीतरी ङ्गुलप्रूङ्ग तंत्रज्ञान व व्यवस्था निर्माण करणे अत्यावश्यक आहे. अलीकडच्या काही वर्षांत डिजिटल ब्लॅकमेलिंगच्या वाढत्या घटना तपास यंत्रणांनाही चक्रावून टाकणार्या आहेत. डिजिटल ब्लॅकमेलिंग म्हणजे इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे व्यक्तीला मानसिक, आर्थिक किंवा सामाजिकदृष्ट्या दबावाखाली आणणे, त्याची खासगी माहिती, ङ्गोटो, व्हिडिओ किंवा अन्य संवेदनशील डेटा उघड करण्याची धमकी देऊन आर्थिक किंवा अन्य प्रकारचा लाभ मिळवणे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये मोठा भाग सोशल मीडियावर किंवा मेसेजिंग ॲप्सवरून घडतो. अनेकदा खोटे खाते तयार करून मैत्रीच्या किंवा व्यावसायिक प्रस्तावांच्या नावाखाली लोकांना जाळ्यात ओढले जाते. काही प्रकरणांत हॅकिंगद्वारे ई-मेल, क्लाउड स्टोरेज किंवा मोबाइल गॅलरीतील खासगी सामग्रीवर अनधिकृत प्रवेश मिळवून त्याचा वापर ब्लॅकमेलसाठी केला जातो. पीडित व्यक्ती बहुतेकदा लाजेखातर, सामाजिक दबाव किंवा कुटुंबाच्या प्रतिमेबाबतच्या भीतीमुळे पोलिसात तक्रार देण्यास टाळाटाळ करतात. पण यामुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढते.

अलीकडेच राजस्थानातील जोधपूर जिल्ह्यातील एका मीडिया इन्फ्लुएंसरला गुन्हेगारांनी अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत २० लाख रुपयांची मागणी केली. त्यांनी धैर्य दाखवून पोलिसात तक्रार नोंदवली. त्यानुसार, पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोन कथित गुन्हेगारांना पकडले आहे. काही दिवसांपूर्वी इलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अजय भनोट यांनी एका महिलेचे खासगी ङ्गोटो व्हॉट्सअॅपवर सार्वजनिक करण्याच्या प्रकरणात जामीन देण्यास नकार देत कठोर टिप्पणी केली होती. केंद्र सरकार, रिझर्व्ह बँक, आयटी सेल्स, पोलीस प्रशासन याबाबत सतर्क झाले आहेत. परंतु तरीही गुन्हेगार विविध माध्यमांतून डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून मोठमोठ्या रकमा उकळण्यात यशस्वी होताहेत.

संगणक, संगणक नेटवर्क, डेटाबेस, डिजिटल डिव्हाइस, इंटरनेट इत्यादींच्या माध्यमातून नवनवीन गुन्ह्यांच्या पद्धती अवलंबल्या जात आहेत. सोशल मीडिया आणि स्मार्टङ्गोनचा वापर करून लोकांच्या खासगी आयुष्यावर परिणाम करण्यासोबतच डिजिटल अरेस्ट, सायबर गुन्हेगारी, ब्लॅकमेलिंग, खंडणी उकळणे असे गंभीर गुन्हे बिनधास्तपणे करत आहेत. विशेष म्हणजे डिजिटल अरेस्ट किंवा बँक खात्यातील पैसे लंपास करणार्या प्रकरणात बळी ठरणारे बहुतांश लोक सुशिक्षित, समाजातील चांगल्या पदांवरून निवृत्त झालेले अधिक असतात. काही दिवसांपूर्वी एका न्यायमूर्तींनी सांगितले की ते स्वतः सायबर फसवणुकीचे बळी ठरण्यापासून थोडक्यात वाचले. यावरून डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हा करणार्यांचे धाडस लक्षात येते. एखाद्या व्यक्तीला काही तास नव्हे तर अनेक दिवस डिजिटल अरेस्ट ठेवून ते हजारो नव्हे तर लाखो रुपये आपल्या खात्यात टाकून घेतात. वस्तुतः सरकार मोबाइल कॉल सुरू होण्याच्या प्रत्येक वेळी ओपनिंग मेसेजद्वारे याबाबत सावध करत आहे, पण तरीही अशा घटनांमध्ये अनेक पटीने वाढ होत आहे. १९७० ते १९९० या दोन दशकांत केविन मिटनिक आणि त्यांच्या सहकार्यांनी मोटोरोला, नोकिया इत्यादींच्या नेटवर्कमध्ये घुसखोरी सुरू केली होती. बॉब थॉमस यांनी क्रीपर व्हायरसच्या माध्यमातून संगणक प्रणालींना मोठे नुकसान पोहोचवले. त्यानंतर तर वेळोवेळी व्हायरसद्वारे संगणक प्रणाली हॅक किंवा बाधित करण्याचा सिलसिला सुरूच राहिला. संगणक आधारित गुन्ह्यांचे ङ्गक्त अमेरिकेतील आणि तेही दहा वर्षांपूर्वीचे आकडेच किती धक्कादायक आहेत पहा. एङ्गबीआयकडून २०१५ मध्ये ङ्गक्त एका वर्षात २ लाख ८८ हजारांहून अधिक तक्रारींसह ४४५ अब्ज डॉलर्सच्या नुकसानीचा दावा करण्यात आला होता. सायबर फसवणुकीच्या प्रकरणांत रशिया पहिल्या क्रमांकावर तर युक्रेन दुसर्या क्रमांकावर आहे. त्यानंतर चीन, अमेरिका, नायजेरिया आणि रोमानियाचा क्रमांक लागतो. यातून स्पष्ट होते की, सायबर ठकसेनांनी जगभरात उच्छाद मांडला आहे.

भारत सरकारच्या गृहमंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या तीन वर्षांतच फसवणुकीच्या नव्या अवतारातून उकळलेली रक्कम २० पट वाढली आहे. २०२५ च्या सुरुवातीच्या दोन महिन्यांतच १७ हजार ७१८ हून अधिक प्रकरणांत २१० कोटी २१ लाख रुपयांहून अधिक रुपयांची फसवणूक झाली आहे.

२०२२ साली सायबर फसवणूक, डिजिटल अरेस्ट, ब्लॅकमेलिंग, ऑनलाइन फ्रॉड इत्यादींच्या ३९,९२५ प्रकरणांत ९१ कोटी १४ लाख रुपयांचा गंडा ठकसेनांनी घातला होता. २०२३ मध्ये यात वाढ होऊन ६०,६७६ प्रकरणांमध्ये ३३९ कोटी रुपये ठकसेनांनी लंपास केले. यानंतर अनेक प्रयत्न करूनही २०२४ मध्ये १,२३,६७२ प्रकरणे घडली आणि त्यात १,९३५ कोटी ५१ लाख रुपयांचा गंडा ठकसेनांनी घातल्याचे समोर आले. ही आकडेवारी पोलिसांत नोंदवल्या गेलेल्या प्रकरणांची आहे. हजारो प्रकरणे अशीही आहेत ज्यात तक्रारच नोंदवली गेली नाही. या गंडाबहाद्दरांनी देशाच्या विविध भागांत आपले तळच उभे केले आहेत. झारखंड, राजस्थान, हरियाणा आणि बिहार ही राज्ये यामध्ये अग्रस्थानी आहेत. हॅकिंग, रॅन्समवेअर, सायबर बुलिंग, ऑनलाइन ङ्गसवणूक, ब्लॅकमेलिंग ही गुन्हेगारांची प्रमुख शस्त्रे आहेत. त्याआधारे लोकांना अशा प्रकारे संमोहित व भयभीत केले जाते की, सुशिक्षित आणि हुशार असूनही ते पैसे गमावतात. जबरदस्ती वसूली, पॉर्नोग्राङ्गी, चाईल्ड पॉर्नोग्राङ्गी, मनी लॉन्डरिंग, औद्योगिक माहिती चोरणे, ड्रग्स, ब्लॅकमेलिंग, धमकावणे असे विविध प्रकारचे गुन्हे करण्यात त्यांनी प्राविण्य मिळवले आहे.

# आम्ही स्वाभिमानी सैनिक बाबासाहेबांचे...

दिनांक : १७ ऑगस्ट २०२५. रोजी र्धी र्द्वीलश यु ट्यूब वर मिशन बौद्धमय भारत या ऍपमध्ये इंग्रजीत मी जयभीमवाला असे रेखाटून आंबेडकरांचीच प्रतिमा सोशल मीडियावर व्हायरल झालेली पोस्ट पहायला मिळाली. ती अत्यंत संतापजनक असून ती निर्माण करणाऱ्यांवर जवळच्या पोलीस ठाण्यात कायदेशीर तक्रार करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

रोज मरे त्याला कोण रडे अशी मराठीत म्हण आहे. होय, हे जरी मान्य केलं तरी परंतु बौद्ध समाजाला रोजच रडावं लागतं. कारण बाबासाहेब समाजमनावर, ह्रदयात, श्वासात कायम आहेत, आमचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर. बाबासाहेबांची विटंबना केल्याने संपूर्ण बौद्ध समाजाला दुखवता येते आणि तो समाज त्या विरोधात मोर्चे, आंदोलने करतो, हे मागील अनेक प्रकारावरून आपण पहातोय. ही परिस्थिती निर्माण करणारी राजकारणी लोकं असतात. मात्र ती शक्ती अदृश्य असते. सत्ता ज्यांना मिळवायची असते अशा राजकारण्यांचा तो एक प्रभावी मार्ग असतो. निवडणूक येण्याआधी सभा सम्मेलन, पोस्टर, भिंतीपत्रके, जाहिराती, यावर खर्च करावा तश्याप्रकारे मतदात्यांना आकर्षित करायला आंबेडकरी जनता खुल्लम खुल्ला तयार असते. ती एकसंघ नाही.तिच्या अनेक तुकडया. जरी असे असले तरी त्या त्या तुकड्या रस्त्यावर येऊन आपल्या प्रेरणास्थानाची विटंबना होते म्हणून जोरदार निदर्शने करतात. अशा प्रसंगी बसेस, वाहने जाळणे,दगड फेक, रस्ता अडवून रहदारी बंद, रेल्वे अडवणे या सारख्या घटना घडविल्या जातात. त्यासाठी विकृत मानसिकता असलेली समाजद्रोही लोकांचा वापर कोण करतो? हीच मानसिकता त्या तुकड्यात असते कां? असे काही घडते तेव्हा पोलीस त्यांना पकडून तुरुंगात टाकतात. मग त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू होतो त्यांत पैश्याचा वापर जो करतो त्याला समाज जवळ करतो.मग समाजाचा तुकडा कायम पडतो. काही स्वाभिमानी तर काही स्वाभिमानशून्य असतात. शून्याचं प्रमाण अधिक मोठं यामुळे वर उल्लेखिलेल्या बाबींचं प्रमाणही अधिक. हे त्यांना चांगलं ज्ञात असल्यामुळे वरील प्रकारे अनैतिक गोष्टीचा वापर केला जातोय. मंत्र युग नव्हे तर या तंत्र युगात अशा -ख तंत्राचा वापर विषमतावादी व्यवस्था करतेय असं म्हटलं पाहिजे.

संविधानाने स्वातंत्र्य, समता, बंधूत्व व सामाजिक न्याय ही मूल्ये प्रत्येक भारतीय नागरिकांस दिलेली असतांना जे संविधानमूल्य पायदली तुडविण्याचे धाडस करतात. अशाकडे डोळेझांक करणाऱ्या व्यवस्थेस विषमच म्हणावे लागते. ह्या विषमव्यवस्थेला अप्रत्यक्षपणे आमच्यातील तुकड्याचं सहाय्य मिळत असतं. ही तुकडेधारी आंबेडकरी चळवळ जोवर तुकडे धारण करीत राहील तोवर मंत्र -तंत्र -यंत्र कोणतेही युग असो ही विकृती दिसणारच.

भारताच्या सर्वोच्च पदी बसलेल्या व्यक्तीचा अनादर म्हणजे त्या पदाचा आदर न करणारी व्यक्ती होय, त्या पदाचा अभिमान न राखणारी व्यक्ती होय. अशी व्यक्ती पदावर असल्यावर ढिसाळ कारभार वर पासून ते खालपर्यंत होणारच. देशाच्या त्या सर्वो च्च पदावर विराजमान होणारी व्यक्ती संविधान मूल्ये जपणारी हवी. लोकशाही लोकांकरिता, लोकांसाठी, लोकांनी जपणूक करावी. म्हणून कुटुंबवत्सल व्यक्तीच सर्वोच्चपदी असावी. असा नियम करुन राज्य आणि केंद्र सरकारात अशा व्यक्तीची निवड करण्यात यावी. अथवा नसेल नियम तर त्यांत दुरुस्ती करावी. तेव्हाच कुटुंब,समाज, देश याचं भान येईल. भान नसलेल्या व्यक्ती देशाची संपत्ती विकून देशाचा कारभार चालवत आहेत. त्याप्रमाणे बँकाकडून मोठी कर्ज घेऊन देशाबाहेर पळून जात आहेत. असं सरकार न्याय देईल यावरचा जनतेचा विश्वास उडालेला असून आता ते सरकारच निवडणुकात वोटचोरी करुन आल्याचं बोललं जातंय. ही बाब गंभीर म्हणता येईल. अशा वेळी त्यांचा अराजक माजविणे हाच हेतू असावा. म्हणून आंबेडकर चळवळीने आता दुष्टांचा संहार करण्याकरिता एकसंघ होऊन तुकड्यात राहू नये. तरच घाणेरडी कृत्ये करणारे जे कोणी असतील त्यांना जरब बसेल.अन्यथा आंबेडकर चळवळीत शहीद होणारे तरुणाची भर पडतच राहील. ती थांबली पाहिजे. नुकतेच बीड मुक्कामी घडलेली घटना आठवा सोमनाथ सूर्यवंशी या नव तरुणाचा पोलिस कोठडीत पोलिसांनीच केलेली हत्या. यावरून न्याय मिळेल अशी अपेक्षा कोण पूर्ण करील. याकरिता नोकरीत, राजकीय क्षेत्रात राखीव जागा मिळते अथवा गेल्यानं केवळ शासन प्रशासकीय सेवेत आमची शासनकर्ती जमात बनतेय असं होत नाही. यासाठी एकसंघ राहिले पाहिजे. संघटित राहिले पाहिजे. सरकारात राहून जनतेचे प्रश्न सोडविले पाहिजेत. त्यासाठी शिक्षणात अग्रगण्य व्हायला पाहिजे.परंतु आजपर्यँतची शासकीय खोगीरभर्ती जनतेच्या उपयोगाची किती?

कालच जोगेंद्र कवाडे यांना नागपूरच्या एका सभेत आयोजकांनी भाषण करण्यास मज्ञाव केल्याची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली. आंबेडकर चळवळीत बेईमानी करणारांना यापुढे कोणीही बोलावणार नाहीत. असं वाटलं. ईमान आणि बेईमान कोण कोण आहेत हे आता जनता ठरविणार की आयोजक ठरविणार? उत्तर सोपे आहे. जनतेने जर ठरविले तरच शक्य आहे. आंबेडकरी जनतेने बेईमान पुढारी ओळखायला हवा. आपल्यासाठी बाबासाहेबांनी स्थापन केलेली रिपब्लिकन पार्टी असावी. अन्य तुकडे विसर्जित करुन पार्टी मजबूत करावी. कारण ह्या तुकडयातुनच बेईमानीचा उगम सुरू होतो हे आता लपून राहिलेले नाही.जनता गुलाम नाही. बाबासाहेब म्हणालेत की, लेट द सलेव्ह बी अवेर ऑफ द सलेव्हरी. ही विल रिबेल अगेनस्ट दॅट स्लेव्हरी. बौद्ध -भीम अनुयायी १९५६ ला गुलामीतून मुक्त झालेत ते गुलाम होतीलच कसे ? आजपर्यँत आपण भावनेच्या आहारी गेल्याने भावनिक झालो होतो त्यांचा गैर फायदा घेऊन कुणी नेते झाले, मंत्री झाले पण जनता विशेषत: बौध्द जनता प्रबुध्द न होता भावनिक झाली. मात्र समय कठीण येऊन ठेपला आहे. संविधान नकोचे संकेतच मिळत असता त्याना सत्तेपासून दूर केले पाहिजे. आज जोगेंद्र कवाडे नको, कालपर्यंतचे ते नेतृत्व स्वाभिमानी होते, करारी बाणा होता. त्यांचा करारीबाणा हाच एक विशेष गुण होय. मराठवाडा विद्यापीठ नामांतर मोर्चात सहभाग घेऊन त्यांनी लाँग मार्च काढला होता. त्यामुळे त्यांना लाँगमार्चचे प्रणेते म्हटले जाते. अशा नेत्यांवर भरसभेतून बाहेर पडण्याची पाळी यावी ही बाब अतिशय अपमानित करणारी होय.

इज्जत जो बुंद से गई वो हौदसे भर कर भी नहीं आती या अवस्थेपर्यंत येण्याचं कारण त्यांनाच ठाऊक. याची दखल इतर तुकड्यानी घेतली पाहिजे. सवलतीचा लाभ घेणाऱ्यांनी त्या घेण्याचंच काम केलं पण बाबासाहेब देऊन गेलेल्या राजकीय पक्षाचे संवर्धन करण्यास आपण अपात्र कसे ठरलो? बाबासाहेबांच्या राजकीय पक्षाचे तुकडे केले की त्या राजकीय पक्षाचा वर्कशॉप केला? आंबेडकरी मूव्हमेंटमध्ये यायचे राजकीय धडे घ्यायचे आणि दुसऱ्याच्या पॉलिटिकल पार्टीत जायचे, तिथे गेलेल्यांनी समाजाचा कोणता उद्धार केल्याचे एखादं उदाहरण तरी सांगता येईल काय? नाही असंच उत्तर आहे. आपण फार तर युती करुन आपली फजितीच होते,असं म्हणू शकतो. पण विजयी नाही होता येत. हेसुद्धा लक्षात येतेय. म्हणून बाबासाहेबांच्या लेकरांनी राजकारणात दरिद्री असू नये. हेच दारिद्रय घालविण्यास आपणास रिपब्लिकन पक्षाचं वैभव प्राप्त करावयाचे आहे. परंतु वैभवा ऐवजी पराभवच वाट्याला येत असतो.

नागपुरात घडलेल्या घटनेचा पुन्हा प्रत्यय येऊ द्यायचा नसेल तर यापुढे आंबेडकरी चळवळ ही एकसंघ पक्षाची चळवळ आहे तिची कोठेही कार्यशाळा अथवा शाखा नाही. हे ध्यानी असावे. तरच युगपुरुषांचे बोल खरे ठरतील. सध्या भाषेचे काहूर उठलेय आज भारतीय जनता पक्ष हयाचं इंग्लिश मध्ये असलेली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हिचे मराठीत केलेलं भाषांतर होय, असंच आहे. त्याकडे पाहिलं तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय जनतेचा विचार केल्याचे यावरून दिसतेय. भाषेचा आडपडदा न येऊ देता त्यांनी दिलेल्या संविधानाची चर्चा, त्यांनीच दिलेल्या राजकीय पक्षाची अवस्था, हे सारंकाही डॉ.बाबासाहेबांचंच तर आहे. मात्र यावरून त्यांच्या विचारधनाकडे आपला दृष्टिकोन कसा, कोणता, कोणाकडे आहे, किती संकुचित किती व्यापक हे पाहणे महत्वाचे ठरते.

..................................

मधुकर मोहिते
( कवि साहित्यीक नेरूळ नवी मुंबई)

# मुळापासून उपटून टाकेल दातातील पायरिया, आयुर्वेदिक तज्ज्ञांनी केवळ ४ पदार्थांचा उपयोग करण्याचा दिला सल्ला

दातांमध्ये पायरिया कसा पसरतो?

दातांची काळजी घेणे किती महत्त्वाचे?

पायरियासाठी घरगुती उपाय

आजच्या काळात जवळजवळ प्रत्येक दुसरा व्यक्ती दात आणि हिरड्यांच्या समस्यांशी झुंजत असलेला दिसून येत आहे. पायरिया, हिरड्यांमधून रक्त येणे, दात किडणे किंवा तोंडाची दुर्गंधी या सर्व सामान्य समस्या बनल्या आहेत. यामुळे केवळ तोंडाचे आरोग्य बिघडतेच असे नाही तर अनेक वेळा ही गोष्ट लाजिरवाणीदेखील वाटते.

आता, जर तुम्हालाही अशा समस्येचा सामना करावा लागत असेल, तर हा लेख तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकतो. अलीकडेच, आयुर्वेदिक डॉक्टर रॉबिन शर्मा यांनी त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये त्यांनी दातांशी संबंधित या सर्व समस्यांपासून मुक्त होण्यासाठी एक प्रभावी रेसिपी सांगितली आहे. चला त्याबद्दल जाणून घेऊया.

डॉक्टर काय म्हणतात?

पायरियाबाबत डॉक्टरांचे म्हणणे

पायरियाबाबत डॉक्टरांचे म्हणणे

व्हिडिओमध्ये डॉक्टर रॉबिन शर्मा यांनी सांगितले की, 'लोक दिवसातून दोनदा ब्रश करतात, पण तरीही त्यांना पायोरिया, हिरड्यांमधून रक्त येणे किंवा तोंडातून दुर्गंधी येणे यासारख्या समस्यांनी त्रास होतो. अशा परिस्थितीत ते महागड्या टूथपेस्टचा वापर करतात, परंतु यापैकी बहुतेक टूथपेस्टमध्ये असलेले ड्ड्ड अर्थात सोडियम लॉरिल सल्फेट आणि फ्लोराईड सारखे रसायने दातांना फायद्यापेक्षा जास्त नुकसान करू शकतात.'

ब्रशने दातांची स्वच्छता करताना १ चूक पडेल भारी; तरूणपणातच बसवावी लागेल कवळी; बाबा रामदेव यांनी सांगितली युक्ती


मग काय करावे?

डॉ. शर्मा पुढे म्हणतात, 'आयुर्वेदात दात आणि हिरड्या स्वच्छ करण्यासाठी अनेक सुरक्षित आणि नैसर्गिक पद्धती सांगितल्या आहेत, ज्या हानीशिवाय परिणाम दर्शवतात. अशा परिस्थितीत, जर तुम्ही योग्य रेसिपीचे पालन केले तर पायोरिया आणि तोंडातून दुर्गंधी येणे यासारख्या समस्या मुळापासून दूर करता येतात.' यासाठी डॉक्टरांनी एक खास रेसिपीदेखील शेअर केली आहे. त्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता असेल जाणून घ्या -

१० ग्रॅम लवंग

२० ग्रॅम हळद





३० ग्रॅम तमालपत्र

४० ग्रॅम खडे मीठ

काय करावे?

या चार गोष्टी एकत्र करून बारीक बारीक करा आणि तयार पावडर हवाबंद डब्यात ठेवा

डॉक्टर दररोज सकाळी आणि संध्याकाळी अर्धा चमचा या पावडरला थोडेसे मोहरीच्या तेलात मिसळून दात घासण्याचा सल्ला देतात

तुम्हाला याचा फायदा कसा होईल?

सर्वप्रथम, लवंगाबद्दल सांगायचे झाले तर, त्यात अँटीसेप्टिक आणि वेदनाशामक गुणधर्म आहेत, जे दातदुखी आणि संसर्ग कमी करतात

हळदीमध्ये नैसर्गिक अँटीबॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आहेत, जे हिरड्यांच्या जळजळ आणि पायरियामध्ये प्रभावी आहेत

तमालपत्र तोंडाची दुर्गंधी दूर करते आणि बॅक्टेरिया नष्ट करते

त्याच वेळी, सैंधव मीठ दातांमधील पिवळेपणा दूर करण्यात आणि त्यांना चमकदार बनविण्यात प्रभावी ठरू शकते, तसेच ते हिरड्यांना मजबूत करते.

डॉ. रॉबिन शर्मा यांच्या मते, ही आयुर्वेदिक कृती पूर्णपणे नैसर्गिक आहे, त्यात कोणतेही हानिकारक रसायन नाही. म्हणून, ती दीर्घकाळ वापरली जाऊ शकते. नियमितपणे असे केल्याने, तुम्हाला थोड्याच वेळात आश्चर्यकारक परिणाम दिसू शकतात.

दातांवरील पिवळ्या थरामुळे हसणं होतंय कठीण? सोपा घरगुती उपाय चमकवेल दात हिऱ्यासारखे

संदर्भासाठी पहा व्हिडिओ

ऋ-टी (संबंधित प्रश्न)

१. पायरिया कोणता आजार आहे?

# पिझ्झा-बर्गर खाल्लात? पण ते पचवण्यासाठी चालले तर पाहिजेच! पण किती? जाणून घ्या

पिझ्झा, बर्गर, समोसे, छोले-भटुरे यांची नावे ऐकताच जिभेला पाणी सुटते, पण या चविष्ट पदार्थांमुळे शरीरात नकळत प्रचंड कॅलरी जमा होतात आणि त्याचा दीर्घकालीन परिणाम आरोग्यावर होऊ शकतो. अनेकदा आपण थोडंच तर खाल्लंय असा विचार करतो, परंतु हे 'थोडं'ही आपल्या शरीराला जड पडू शकतं. याचा अर्थ असा नाही की आवडते पदार्थ कायमचे टाळावेत, मात्र त्यांचा आस्वाद घेतल्यानंतर त्या कॅलरी जाळण्यासाठी योग्य प्रमाणात शारीरिक हालचाल करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, २ समोसे (४३४ कॅलरी) खाल्ल्यानंतर अंदाजे १ तास ३७ मिनिटे चालावे लागते, १ प्लेट छोले-भटुरे (८८५ कॅलरी) साठी ३ तास १९ मिनिटे, २ पिझ्झा स्लाइस (६०० कॅलरी) साठी २ तास १५ मिनिटे आणि बर्गर (६५३ कॅलरी) साठी २ तास २७ मिनिटे चालावे लागते. लहान वाटणाऱ्या गोड पदार्थांमध्येही कॅलरी भरपूर असतात, २ गुलाबजाम (३०० कॅलरी) जाळण्यासाठी सुमारे १ तास ८ मिनिटे आणि आइसक्रीम बार (२४० कॅलरी) साठी ५४ मिनिटे चालावे लागते. यावरून स्पष्ट होते की चवदार स्नॅक्स खाल्ल्यानंतर त्यांना पचवण्यासाठी व्यायाम किंवा चालणे हे आवश्यकच आहे.

आरोग्य टिकवण्यासाठी 'स्मार्ट स्नॅकिंग' या सवयी अंगीकारणे महत्त्वाचे आहे. प्रथम, पॅकेटबंद स्नॅक्स घेताना फक्त कॅलरी नव्हे, तर घटकांची यादी वाचा. पहिल्या काही घटकांत साखर, रिफाइंड पीठ किंवा तेल असल्यास ते रोज न खाता कधीतरीच खावे. दुसरे, पोषणमूल्यांवर भर द्या, ताजे फळ, उकडलेले चणे, दही, भुईमूग, गाजर काकडीचे काप हे उत्तम पर्याय आहेत. तिसरे, खाण्याची मात्रा नियंत्रित ठेवा. थेट पॅकेटमधून न खाता छोट्या वाटीत घेऊन खा, त्यामुळे किती खातोय हे लक्षात राहते. चौथे, प्रोटीन किंवा फायबरयुक्त पदार्थांसोबत स्नॅक्स खा. अंडे, पनीर, दही, नट्स यामुळे जास्त वेळ पोट भरल्यासारखे वाटते.

झरीशपीेंळपस ढर्ळीी: मुलं का बिघडत आहेत? 'आई - वडिलांच्या चुका', काय बोलून गेले प्रेमानंद महाराज, पालकांनी वाचाच!

पाचवे, माइंडफुल ईटिंग करा. टीव्ही किंवा मोबाईल पाहत खाताना आपण नकळत जास्त खातो, त्यामुळे शांतपणे बसून खाण्याकडे लक्ष द्या. सहावे, वेळेची काळजी घ्या. रात्री उशिरा खाल्लेले स्नॅक्स चरबीच्या स्वरूपात साठण्याची शक्यता जास्त असते. आणि सातवे, खाण्यापूर्वी पाणी प्या. अनेकदा भूक नसून तहान लागलेली असते. थोडक्यात, पिझ्झा-बर्गर खाणं चुकीचं नाही, पण त्यानंतर पुरेसा व्यायाम, चालणे आणि स्मार्ट खाण्याच्या सवयी अंगीकारणं हीच खरी आरोग्याची गुरुकिल्ली आहे.

# भाजी काय बनवावी सुचत नाही? मग सोप्या पद्धतीमध्ये घरी बनवा भेंडीचा रायता, नोट करून घ्या रेसिपी

सकाळी उठल्यानंतर सगळ्यांचं खूप जास्त घाई असते. घाईगडबडीच्या वेळी जेवणाच्या डब्यात भाजी काय बनवावी सुचत नाही. नेहमीच डब्यात कडधान्य किंवा ठराविक भाज्या खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा सगळ्यांचं होते. अशावेळी तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये भेंडीचा रायता बनवू शकता. लहान मुलांसह अगदी मोठ्यांना भेंडीची भाजी खायला खूप असत आवडते. भेंडीच्या भाजीमध्ये काही लोक शेंगदाण्याचा कूट टाकतात तर काही लोक ओल किसलेलं खोबर टाकतात. अनेक वेगवेगळ्या पद्धतीने भेंडीची भाजी बनवली जाते. भेंडीच्या भाजीचा रायता चवीला अतिशय सुंदर लागतो. आंबट गोड चवीच्या रायत्यासोबत जेवणात चार घास जास्त जातील. चला तर जाणून घेऊया भेंडीचा रायता बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

भेंडी

दही

मीठ

हिरवी मिरची

जिऱ्याची पावडर

लाल तिखट

हळद

तेल

कोथिंबीर

बेसन

साखर



कृती: भेंडीचा रायता बनवण्यासाठी सर्वप्रथम, भेंडी स्वच्छ धुवून कपड्याने पुसून घ्या. त्यानंतर भेंडीचे उभे बारीक तुकडे करून घ्या.कढईमध्ये तेल गरम करून त्यात भेंडी भाजण्यासाठी टाका. भेंडी भाजताना त्यात चवीनुसार मीठ टाका. यामुळे भेंडी बेचव लागणार नाहीत.

# बहुजन समाजाची फसवणूक करणारा नेता, माजी नगर सेवक कपिल मस्के याच्या वर गुन्हे दाखल करावे - चंद्रकांत खरात सर. मराठवाडा संघटक, भिमशक्ती सामाजिक संघटना.

केज/प्रतिनिधी केज येथील सोशल मिडीया वर व्हायरल आडीओ क्लिप प्रकरणाने संपूर्ण बीड जिल्हयात खळबळ माजवली असतांना आज दिनांक २१, ऑगस्ट रोजी केज रमाई नगर येथील गायरानच्या मुद्यावर भिमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने पत्रकार परिषद आयोजीत केली होती संबंधीत पत्रकार परिषदेत बोलताना भिमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक, चंद्रकांत खरात सर यांनी स्वंय घोषीत नेता, माजी नगर सेवकावर गुन्हे दाखल करावे असे सांगितले.



केज शहरात दोन ते तीन दिवसा पासून सोशल मिडीयावर व्हायरल आडीओ क्लिप मुळे सर्वत्र खळबळ उडाली असून केज शहरातील रमाई नगर भागामध्ये शासकिय गायरान जमिनीवर दलीत समाजातील गोर गरीब, होतकरू अशा लोकांनी आपापली घरे तयार करून आपले वास्तव्य केले आहे, परंतु दलित समाजातील पावसाळ्यातील छत्री प्रमाणे उगवले ला स्वंयघोषीत नेता, माजी नगरसेवक दलित समाजाची फसवणूक करत असून स्वतःच्या स्वर्थासाठी दलीत समाजाला वेठीस धरून फसवणूक करत असल्याचे संबधीत आडीओ क्लिप वरून निदर्शनास येत आहे रमाई नगर केज येथील गायरान जमिनी प्रकरणी समाजाच्या नावाने दलाली करणाऱ्या तसेच समाजाच्या नावाने स्वतःची राजकिय पोळी भाजून स्वार्थ करु पाहणाऱ्या स्वंयघोषीत दलीत नेत्यावर, माजी नगरसेवका वर गुन्हे दाखल करावेत असे भिमशक्ती संघटने कडून आयोजीत पत्रकार परिषदेत बोलताना भिमशक्ती संघटने चे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांनी सांगितले. पुढे बोलताना भिमशक्ती संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांनी सांगितले कि, स्वंय घोषीत, दलित नेता, माजी नगरसेवक कपिल मस्के हा शरद पवार राष्ट्रवादी गटाचा कार्यकर्ता असून या गटाचे खासदार साहेबांनी संबंधित, दलित समाजाच्या नावा खाली दलाली करून, समाजाला वेठीस धरून दलित समाजाची फसवणूक करून मड्यावरचे लोणी खाणाऱ्या, पावसाळ्यातील छत्री प्रमाणे उगवलेल्या नेत्याची,स्वंय घोषीत माजी नगरसेवकाची तात्काळ पक्षातून हाकलपट्टी करण्यात यावी अन्यथा भिम शक्ती संघटनेद्वारे खासदार यांना सदर प्रकरणी जाब विचारला जाईल असा इशारा देखील चंद्रकांत खरात सर यांनी दिला आहे. आणि रमाई नगर केज येथील गोर गरीब, होतकरू दलित समाजास न्याय द्यावा, तसेच सामाजातील नेत्यांना डबडे म्हणून त्यांची भर सभेत खिल्ली उडवणाऱ्या तसेच समाजाच्या नावाखाली दलाली करणाऱ्या माजी नगरसेवकास तात्काळ पक्षातून काढून टाकावे अन्यथा दलित समाजाच्या रोशाला खासदार सोनवणे यांना सामोरे जावा लागेल असे बोलताना चंद्रकांत खरात सर यांनी स्पष्ट केले आहे.रमाई नगर येथील गरीब, असहाय्य दलित समाजास खासदार, बजरंग बप्पा यांनी न्याय द्यावा, अन्यथा परिणामी प्रकरणाला खासदार सोनवणे जबाबदार राहतील भिमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांनी केली. प्रसंगी दलित समाजासाठी संबंधीत स्वंयघोषीत दलित नेत्यावर गुन्हे दाखल करण्यासाठी रस्त्यावर उतरून, मोठा लढा उभा केला जाईल, गरीब, वंचित बहुजन, दलीत समाजाच्या झोळीतील खाणाऱ्या दलाल नेत्या वर गुन्हा दाखल करण्यासाठी तसेच भिमशक्ती संघटनेच्या माध्यमातून दलित समाजासाठी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संपूर्ण ताकतीने लढा देणार असल्याचे त्यांनी सांगीतले तसेच संबंधीत दलाल, मड्यावरचे लोणी खाणाऱ्या स्वंय घोषीत दलीत नेता, माजी नगरसेवक कपिल मस्के याच्यावर गुन्हे दाखल होत नाहीत तोपर्यंत भिमशक्ती संघटनेच्या माध्यमातून दलित समाजासाठी लढा देवू असे त्यांनी सांगितले. तसेच भिमशक्ती संघटनेच्या च्या सर्व पदाधिकारी यांनी आपापल्या प्रतिक्रिया देवून दलित समाजाच्या अन्याया विरुद्ध एकजूटीने लढा देण्याचे सांगितले यावेळी भिम शक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर, अशोक सरवदे तालुका उपाध्यक्ष, शिवमुर्ती हजारे शहराध्यक्ष, भिम शक्ती संघटनेचे जेष्ठ नेते सुभाष सरवदे यांसह ' भिम शक्ती संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आतापर्यंत ६ वेळा बदलण्यात आलाय देशाचा राष्ट्रीय ध्वज; भारताला कसा मिळाला तिरंगा? जाणून घ्या इतिहास

भारताचा राष्ट्रध्वज हा केवळ तीन रंगांचा कपड्याचा तुकडा नाही, तर तो आपल्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा, बलिदानाचा आणि अखंड ऐक्याचा जिवंत साक्षीदार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारत एक गुलाम देश असताना, राष्ट्रीय ध्वज ही केवळ ओळख नव्हती, तर ती स्वातंत्र्यप्राप्तीची प्रेरणा होती. या ध्वजासाठी लाखो स्वातंत्र्यसैनिकांनी तुरुंगवास भोगला, छळ सहन केला आणि प्राणांचे बलिदान दिले. आज जेव्हा आपण तिरंगा हातात घेतो, तेव्हा त्यामध्ये फक्त रंग आणि चिन्हे दिसत नाहीत, तर त्याच्या प्रत्येक धाग्यात आपल्या पूर्वजांचा संघर्ष, त्यांची जिद्द आणि देशप्रेम दडलेले असते. आपल्या राष्ट्रध्वजाचा प्रवास अनेक टप्प्यांतून, अनेक आवृत्त्यांतून झाला आणि अखेर २२ जुलै १९४७ रोजी त्याला आजचे अंतिम स्वरूप मिळाले. चला, या प्रवासाचा टप्प्याटप्प्याने आढावा घेऊया.

१. पहिला राष्ट्रध्वज (१९०६) ७ ऑगस्ट १९०६ रोजी कलकत्ता (पारसी बागान चौक) येथे पहिला राष्ट्रीय ध्वज फडकावण्यात आला.

हिरवा, पिवळा आणि लाल अशा तीन आडव्या पट्ट्यांमध्ये विविध प्रतीके होती.

२. दुसरी आवृत्ती (१९०७) मॅडम भिकाजी कामा यांनी जर्मनीतील स्टुटगार्ट येथे दुसरा ध्वज सादर केला. पहिल्या ध्वजासारखाच होता पण थोडे प्रतीकात्मक बदल होते. ३. तिसरी आवृत्ती (१९१७) ज्येष्ठ नागरिकांसाठी डेंटल इम्प्लांटची किंमत तुम्हाला आश्चर्यचकित करू शकते एकदा हे खाऊन पहा, तुमची पुरुषी शक्ती १० पटीने वाढेल.

# श्री कुमारस्वामी महाविद्यालयातील सायबर सुरक्षा कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना मिळाली नवी दिशा



लातूर/प्रतिनिधी:- इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे आजच्या विद्यार्थ्यांसमोरील सायबर जोखमींवर लक्ष देत श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त प्रयत्नातून झालेल्या या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना डिजिटल जबाबदारी आणि सुरक्षित इंटरनेटचा उपयोग शिकवणे होते. कार्यशाळेत 'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून सोप्या उदाहरणांद्वारे मार्गदर्शन केले. त्यांनी सोशल मीडियाचा जबाबदारीने उपयोग कसा करावा, अनोळखी लिंक आणि फिशिंग मेसेज कसे ओळखायचे, मजबूत आणि सुरक्षित पासवर्ड कसा तयार करायचा याबाबत स्पष्ट सूचना दिल्या. तसेच ऑनलाइन बँकिंग व डिजिटल पेमेंट करताना कोणती सावधगिरी घ्यावी याबाबतही महत्त्वाचे टप्पे सांगितले. सायबर फसवणूक किंवा गुन्हा झाल्यास घाबरून न जाता तक्रार नोंदविण्याचे महत्त्वही कार्यक्रमात अधोरेखित केले गेले; त्यासाठी उपलब्ध हेल्पलाईन क्रमांक १९३० व ऑनलाईन तक्रार पोर्टलचा कसा वापर करावा हे विद्यार्थ्यांना शिकवण्यात आले.

कार्यशाळेला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुसुम ढोणे आणि प्राध्यापक वर्गामध्ये डॉ. प्रसाद कदम, डॉ. सुभाष इंदलकर, प्रा. रवि जाधव, प्रा. मधुकर कदम, प्रा. शिवराज मिटकरी यांची उपस्थिती होती. कार्यशाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. उपस्थित शिक्षकांना व आयोजकांना असे वाटते की या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जागरूकता वाढली आहे आणि ते आता इंटरनेटचा अधिक सुरक्षित व सजगपणे वापर करतील. ही कार्यशाळा केवळ तांत्रिक माहितीपुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना डिजिटल जगात जबाबदार नागरिक म्हणून वागण्याची प्रेरणा देणारी ठरली.

# समाजभूषण मा श्री उत्तम तरकसे यांचा झारखंड राज्यात सन्मान



झारखंड:- दि.११/०८/२०२५ पासून शासकीय कामानिमित्त मध्य प्रदेश उत्तर प्रदेश बिहार पश्चिम बंगाल व झारखंड राज्यात गृह विभागाच्या शासकीय कामानिमित्ताने सदर राज्याच्या दौऱ्यावर समाजभूषण श्री उत्तमराव दासू तरकसे (महाराष्ट्र राज्य शासन डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) हे सदर राज्याच्या दौऱ्यावर असताना दि.१५/०८/०२५ रोजी ७९ व्या भारत स्वातंत्र्यदिनी झारखंड राज्यातील देवधर जिल्ह्या मधे सारवॉ पोलीस ठाणे येथे हजर असताना सदर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मा श्री कौशल कुमार सिंग यांनी श्री तरकसे यांचा सन्मान करत राष्ट्रीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम समाजभूषण मा श्री तरकसे यांच्या हस्ते साजरा करण्यात आला, तेव्हा श्री तरकसे यांनी सर्व पोलीस ठाण्यातील तैनाती असलेले सर्व अधिकारी व अंमलदार यांचे खूप खूप आभार मानले

सदर कार्यक्रमास एएसआय वीरेंद्र राम चौकीदार हजर व इतर सर्व सदर पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार तसेच सदर गावचे व आसपासच्या परिसरातील सुज्ञ नागरिक मोठ्या संख्येने हजर होते.

# आपले लातूर सुरक्षीत लातूर उपक्रम अंतर्गत गणेश मंडळांनी सीसीटीव्ही लावण्याचे लातूर पोलिसांचे आवाहन.

लातूर :- आपले लातूर सुरक्षीत लातूर उपक्रम अंतर्गत गणेश मंडळांनी सीसीटीव्ही लावण्याचे लातूर पोलिसांचे आवाहन.*

याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे संकल्पनेतून लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत आपले लातूर सुरक्षीत लातूर उपक्रम राबविण्यात येत आहे.

यामध्ये सुरक्षित लातूर साठी संपूर्ण जिल्ह्यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्या करिता विविध उपाय योजना करण्यात येणार आहेत. काही दिवसातच गणेशोत्सवाला सुरुवात होणार असून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात अतिशय उत्साहात गणेश उत्सव साजरा करण्यात येतो. सदरचा गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडावा या करिता लातूर पोलिसांनी जय्यत तयारी केली आहे.

गणेशोत्सव काळात कोणतीही अनुचित घटना टाळण्यासाठी आणि महिलांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक गणेश मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात येत आहे.

गणेश मंडळानी पेंडाल व परिसरामध्ये कमीत कमी ०४ सीसीटीव्ही कॅमेरे लावावे असे बंधन गणेश मंडळांना करण्यात येणार आहे, तसेच जे गणेश मंडळ ०४ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील त्या गणेश मंडळाचा संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सत्कार करुन प्रशस्तीपत्र देणार आहेत, जे गणेश मंडळ हे ०८ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील त्यांना उपविभागीय पोलीस अधिकारी हे सत्कार करून प्रशस्तीपत्र देतील. तसेच जे गणेश मंडळ १६ सीसीटिव्ही कॅमेरे लावतील त्यांचा जिल्हा स्तरावर पोलीस अधीक्षक यांचे मार्फत सत्कार करुन प्रशस्तीपत्र देवुन गौरव करण्यात येणार आहे.

तसेच गणपती उत्सव संपल्यानंतर गणेश मंडळाने लावलेले कॅमेरे हे त्यांचे गावातील/चौकामध्ये महत्वाचे ठिकाणी कायमस्वरुपी लावण्यात जावेद, जेणे करुन लोकसहभागातुन सुरक्षीत लातूर ही संकल्पना यशस्वी होण्यास मदत होईल.

गणेश मंडळांनी सीसीटीव्ही बसवल्यास महिला आणि युवतींच्या सुरक्षेला मदत/ प्रोत्साहन मिळेल. गणेश मंडळांनी आपल्या वर्गणीचा सदुपयोग करून लोकसहभागातून सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, गणेश मंडळांनी पोलिसांनी घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे, वेळेचे बंधन पाळावे, ध्वनिप्रदूषण टाळावे आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरा करावा, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# पर्यावरण संवर्धन व प्रदूषण या विषयांवर मार्गदर्शन व वृक्षारोपण कार्यक्रम





लातूर /प्रतिनिधी : पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार व केंद्रीय आणि राज्य प्रदूषण नियंत्रण बोर्ड अंतर्गत राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम (National Clean -ir Programme) विभागा मार्फत लातूर शहर महानगरपालिकेमार्फत शहरातील वायु, धुळ प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी अनेक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन आज दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी राजमाता जिजाऊ मनपा शाक्र.११, साळे गल्ली, लातुर येथे आयुक्त श्रीमती मानसी व अतिरिक्त आयुक्त तथा नोडल अधिकारी देविदास जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पर्यावरण संवर्धन व प्रदूषण या विषयांवर मार्गदर्शन व वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमात विद्यार्थी व परिसरातील नागरीकांना वायू व धुळ प्रदूषणा बाबत मार्गदर्शन व उपाययोजना सांगण्यात आल्या व वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धन व प्रदूषण या विषयांवर मार्गदर्शन व वृक्षारोपण कार्यक्रम

सदर कार्यक्रमास श्रीमती. गीतांजली कौशिक, सल्लागार, NC-P यांनी मार्गदर्शन केले सोबत मनपातील पर्यावरण संवर्धन अधिकार श्रीम.सन्मती मेस्त्री, शाखा अभियंता श्री. गणेश देवणीकर, NC-P विभागातील श्री. पंडीत लोहारे, मुख्याध्यापक श्री. वैभव बोंदर तसेच यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी आज अंतिम प्रभाग रचना होणार जाहीर

लातूर :- राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिव यांच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार लातूर जिल्हा परिषदेच्या ५९ जागा आणि त्याअंतर्गत सर्व पंचायत समित्यांच्या ११८ जागांसाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार २२ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध होणार आहे. ही अधिसूचना लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध असेल. सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचनेचे अवलोकन करावे, असे आवाहन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने करण्यात येत आहे.


# शेतकरी कर्जमाफी व मराठा आरक्षणासाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन



लातूर:- या सरकारने शेतकऱ्याची दिशाभूल केली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी सध्या अडचणीत सापडला आहे.शेतकऱ्याच्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही.सोयाबीनचा भाव साडेतीन हजाराच्या पुढे जात नाही. निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्याची कर्जमाफी करतो म्हणणारे मुख्यमंत्री सध्या गप्प बसले यामुळे महागाईने उच्चांक गाठला आहे. बळीराजा होरपळा जात आहे मराठा आरक्षणाची दग संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पसरली असून सुद्धा या सरकारला हे दिसत कसं नाही या सरकारला जाग करण्यासाठी आज संभाजी ब्रिगेडचे लातूर जिल्हा अध्यक्ष प्रमोद कदम, राजकुमार माने यांच्या नेतृत्वामध्ये हे लक्षवेधी आंदोलन करण्यात आले व सरकार समोर या मागण्या प्रमुख मागण्या करण्यात आले शेतकऱ्याला सरसकट कर्जमाफी द्या, मराठा व इतर समाज बांधवांचा आरक्षणाचा मार्ग मोकळा करा, दुधाला प्रति लिटर ७० रुपये प्रमाणे भाव द्या, ऊसाला एफ आर पी प्रमाणे सात दिवसात रक्कम द्या.साखर कारखान्यावर दोष विरहित पारदर्शक दोषविरहित वजनकाटे बंधनकारक करा,अतिवृष्टी झाल्याने दुष्काळ जाहीर करा,हेक्टरी ५० हजार रुपये प्रमाणे नुकसान भरपाई द्या, व ईव्हीएम बंद करून बॅलेट पेपरवर देशाच्या निवडणुका घ्या या प्रमुख मागण्यासमोर करत आजही एक दिवसीय लक्षवेधी आंदोलन करून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात या मागणीचे निवेदन देऊन मुख्यमंत्र्यांनी या विषयाकडे सकारात्मक बघून तात्काळ आमच्या मागण्या मान्य कराव्या असे नमूद करण्यात आले.यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हा सचिव इर्शाद शेख, महानगराध्यक्ष गजानन जाधव, उद्योजक कक्षाचे जिल्हाध्यक्ष मिथुन दिवे, बळवंत चिंचोलकर,उत्तम फड, रमेश लाबोटे, जावेद मुजावर,सलीम पठाण सिद्धेश्वर तेलंगे, जिल्हा संघटक मेहबूब सय्यद, मोहनेश्वर विश्वकर्मा,राजकुमार भालेराव या पदाधिकाऱ्यांचे स्वाक्षरी निवेदन देण्यात आले

# लातूर जिल्हा बँकेच्या गौरवशाली परंपरेत आ. संभाजी पाटील निलंगेकरानी संभ्रम निर्माण करू नये शेतकरी हित हेच सर्वोच्च ध्येय असलेल्या जिल्हा बँकेत संभ्रम करणारे आ. संभाजी पाटील शेतकऱ्याच्या नजरेत तोंडघशी पडतील

लातूर :- राष्ट्रीय पातळीवर असंख्य पुरस्कार प्राप्त करणारी राज्यातील जिल्हा बँकात टॉप तीन मध्ये असलेली लातूर जिल्हा सहकारी बँक ही शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून जिल्ह्यातील शेतकरी सभासदांत आमदार संभाजी पाटलांनी बेताल वक्तव्य करून संभ्रम निर्माण करू नये असा सल्ला शेतकरी संघटनेचे प्रवक्ते नेते राजेंद्र मोरे यांनी दिला आहे. आमदार संभाजी पाटील यांच्या आरोपाला शेतकरी भीक घालणार नाही लातूर जिल्ह्याची निर्मिती होऊन अवघे चार दशक झाले आहेत. लातूर जिल्हा निर्मितीनंतर लातूरचे नंदनवन करण्यासाठी राज्याचे माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांचे कार्य कोणालाही विसरता येणार नाही.जिल्ह्यात शिक्षण, सहकार उद्योग,कला, क्रीडा,सामाजिक न्याय, कृषी, आणि सहकार अशा विविध क्षेत्रात आपली वैचारिक दूरदृष्टी वापरून अचूक असे सूक्ष्म नियोजन करून झपाट्याने पुढें घेवुन विकास करण्यासाठी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी पुढाकार घेतल्याचे चित्र सर्वश्रुत आहे. संपूर्ण जिल्ह्यात सामान्य माणसांना शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी आणि त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सहकार क्षेत्राचे जाळे निर्माण केले असून आज चौफेर प्रगती दिसून येत आहे. लातूरची संस्कृती ही विविध विचारधारा जोपासणारी असतानाही विकासाच्या मुद्द्यावर लातूरचे नेतृत्व एकत्रित असल्याची परंपरा संपूर्ण महाराष्ट्राला लातूर जिल्ह्याला माहिती आहे.लातूर जिल्हा बँकेच्या माध्यमातून संपूर्णपणे शेतकऱ्यांच्या जीवनात कायापालट झाला असून आनंद सुख समृद्धी नांदत आहे. उद्योग क्षेत्रात भरीव मदत करताना शेतकरी हाच केंद्रबिंदू मानून अनेक सहकारी कारखान्यांना आर्थिक मदत करताना शेतकऱ्यांना पाच लाखापर्यंतचे बिनव्याजी कर्ज देण्याचा विक्रम याच बँकेच्या नावावर आहे. एकंदरीत बँकेचा कारभार हा अतिशय पारदर्शी असून हजारो शेतकऱ्यांना याचा प्रत्यक्ष फायदा झाल्याची माहिती बँकेच्या लेखापरीक्षणातून आणि बँकेकडून ठेवलेल्या नोंदीवरून दिसून येतो. मात्र परवाच माजी मंत्री आमदार संभाजी पाटील यांनी बँकेच्या कारभारावर बेछूट आणि बेजबाबदार आरोप करताना शेतकऱ्यात संभ्रम निर्माण करण्याचा केविलवाना प्रयत्न केलेला आहे परंतु अशा आरोपाला इथला शेतकरी भीक घालणार नाही असे मत शेतकरी नेते राजेंद्र मोरे प्रसिध्दी पत्रकातून व्यक्त केला आहे.



मानसिक संतुलन बिघडले

आ.संभाजीराव पाटलांना त्यांच्या पक्षात काडीची सुद्धा किंमत राहिली नसल्याने त्यांचे मानसिक संतुलन ढासळले असल्याने त्यांनी तातडीने मानसोपचार तज्ञाची भेट घेऊन आपला इलाज करून घ्यावा अशी खोचक टीका श्री मोरे यांनी करुन आमदार संभाजी पाटील यांच्या आजोबाच्या नावाने असलेला कारखाना, बँक आणि संस्था मातीमोल झालेल्या आहेत त्याची डागडुजी करण्यासाठी आपला वेळ आणि वजन खर्ची करावे जेणेकरून या जिल्ह्याला स्वर्गीय विलासराव देशमुख स्वर्गीय शिवाजीराव पाटील निलंगेकर शिवराजजी पाटील चाकूरकर अशा विचारवंत नेत्यांच्या परंपरेला तडा जाणार नाही. जिल्हा बँकेच्या ठेवी व शाखेचा डोलारा हाच मोठा विश्वास लातूर जिल्हा बँकेत शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी भेट देवून बँकेचा असलेला पारदर्शकता व बँकेच्या एकूण ठेवी आणि शाखेचा विस्तार प्रत्यक्ष पाहिला असता हा विश्वासाचं डोलारा आहे त्यामुळे सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या समर्थ नेतृत्वाखाली अनेक संस्था जिल्हाभरात प्रगतीपथावर असून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडून आलेली आहे त्यामुळे संभाजी पाटलांनी सूर्यावर थुंकू नये अन्यथा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने जिल्हाभरात संभाजी पाटील निलंगेकर यांच्या विरोधात लवकरच तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे

# कावळ्याला वाचवण्यासाठी अग्निशमन दलाची धावाधाव; मांज्यात गुरफटलेल्या कावळ्याची तब्बल एक तासाने सुटका.





लातूर / प्रतिनिधी :- शहरातील शिक्षण उपसंचालक कार्यालय गांधी चौक येथील आवारात नायलॉनच्या मांजा दोऱ्यात गुरफटून झाडावर लटकत असलेल्या जिवंत कावळ्याला वाचवण्यासाठी अग्निशमन दलाची धावाधाव झाली असून तब्बल एक तास कावळ्याचे बचाव कार्य सुरू होते. शिक्षण विभागाच्या उपसंचालक कार्यालयाच्या समोर असलेल्या एका झाडावर कावळा जोरजोरात ओरडत असल्याचे चित्र शिवराम कांबळे यांच्या नजरेस पडले त्यांनी कावळ्यांचा एवढा आवाज का होत आहे याचे निरीक्षण केल्यावर नायलॉनच्या मांज्या दोऱ्यामध्ये कावळा गुरफटला गेला आहे आणि तो झाडावर लटकत असल्याचे चित्र लक्षात आले त्यानंतर त्यांनी क्षणाचाही विलंब न करता अग्निशमन दलाला पाचारण करताच अग्निशमन दल घटनास्थळावर दाखल होत नायलॉनच्या मांज्या दोऱ्यात गुरुपटलेल्या कावळ्याला वाचवण्यासाठी बचाव कार्य सुरू केले पण कावळ्यांचा गोंधळ त्यांना काय जमू देत नव्हता. शेवटी अथक प्रयत्नानंतर कावळ्याला खाली उतरवण्यात आले व त्याच्या सभोवताली पंखाला गुरफटलेल्या नायलॉनचा मांज्या दोरा काढण्यात आला. तो खूप तहानलेला असल्यामुळे त्याला पाणी पाजून अन्न दिले. त्याच्या पंखाला इजा झाली असून सध्या तो पक्षीमित्र मेहबूब यांच्या कडे निगराणीखाली आहे. अशी माहिती अग्निशमन दलाचे प्रमुख गणेश चौधरी यांनी लातूर नेता न्यूज ला बोलताना दिली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE